सोळावी

आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

# देश – विदेशातील साहित्यिक, समाज सुधारक, संशोधक आणि शास्त्रज्ञ यांचे योगदान

भाग तीन

संपादक

डॉ. स्नेहल तावरे

डॉ. मंजुषा धुमाळ

डॉ. शिल्पागौरी गणपुले

स्नेहवर्धन प्रकाशन

पुणे

ꣽ स्नेहवर्धन प्रकाशन : क्र. १२७५

ꣽ देश - विदेशातील साहित्यिक, समाजसुधारक, संशोधक आणि शास्त्रज्ञ यांचे योगदान - भाग तीन
(समीक्षा - संदर्भ)

ꣽ **प्रकाशक आणि मुद्रक :**
डॉ. एल. व्ही. तावरे
स्नेहवर्धन, ८६३ सदाशिव पेठ, महात्मा फुले सभागृहामागे,
पुणे - ४११ ०३०.
स्थिरसंवाद : (०२०) २४४७ २५ ४९ / २४४३६९६१
भ्रमणसंवाद : ९४२३६४३१३१ / ९०७५०८१८८८
ई-मेल : snehaltawre@gmail.com

ꣽ © S.R.I.

ꣽ **प्रथमावृत्ती :** ८ फेब्रुवारी २०१९,
सोळावी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

ꣽ **मुखपृष्ठ :** संतोष धोंगडे

ꣽ **अक्षरजुळणी :** एस. एस. ग्राफिक्स, पुणे

ꣽ **मुद्रणस्थळ :** स्मिता प्रिंटर्स, पुणे

ꣽ ISBN 978-93-87628-44-1

ꣽ **पृष्ठसंख्या :** १६२

ꣽ **मूल्य : ₹ २००/-**
**$ 3**

# अनुक्रमणिका


- योगदानाच्या निमित्ताने.... — डॉ. स्नेहल तावरे, डॉ. मंजुषा धुमाळ, डॉ. शिल्पागौरी गणपुले /७

१) डॉ. प्रज्ञानंद दामले : प्रज्ञावान शिक्षक — डॉ. पंडित विद्यासागर /९

२) १४ वे रत्न : मा. श्री. नरेंद्र मोदीजी — श्री. उज्ज्वल ठेंगडी /१३

लंडन

३) अष्टपैलू प्रज्ञावंत साहित्यिक पु. ल. देशपांडे — डॉ. नीला पांढरे /१७

४) लोकसंस्कृतीचे संवर्धक डॉ. द.ता. भोसले — डॉ. स्नेहल तावरे /२१

५) विचारांची बांधीलकी जपणारे लोकनेते मारुतराव घुले पाटील — डॉ. शिरीष लांडगे /२५

६) बारामती (जि. पुणे) चे साने गुरुजी प्रा. डॉ. (कै.) दयाराम पाटील — डॉ. मधुकर मोकाशी /२९

७) शाहीर हैबती — डॉ. वर्षा कीर्तने /३३

८) गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान — डॉ. मच्छिंद्र गोंटे /३७

९) नाट्यप्रेमी, नाट्यसमीक्षक डॉ. वि. भा. देशपांडे — डॉ. मधुरा कोरान्ने /४१

१०) महात्मा गांधीजींचा दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रह : एक दृष्टिक्षेप — डॉ. आशा मुंडे /४४

११) कर्मयोगी पंडित सहदेव — डॉ. मधुमती कुंजल /४८

मॉरिशस

१२) कार्ल मार्क्सचे आर्थिक विचार — डॉ. उत्तम मानवते /५२

१३) महाराष्ट्रातील सामाजिक विकासाच्या चळवळी — डॉ. नितीन चांगोले /५६

१४) वर्धा जिल्ह्यातील समाजसेविका सिंधुताई सपकाळ यांच्या कार्याचे अवलोकन — डॉ. माया वानखडे /६०

१५) लोकशाही मूल्याचे उद्गाते – महात्मा बसवेश्वर — डॉ. रवींद्र बेम्बरे /६४

१६) साहित्यिक यशवंतराव चव्हाण — डॉ. हणमंत पोळ /६८

१७) आधुनिक भारताच्या इतिहासातील आध्यात्मिक मार्गदर्शकांचे योगदान — डॉ. राजेश कुलकर्णी /७२

१८) गोपाळ गणेश आगरकरांचे मराठी वृत्तपत्रातील योगदान — डॉ. सुभाष आहेर /७६

१९) अरुण कोलटकरांचे मराठी साहित्यातील योगदान — **डॉ. वैजयंतीमाला जाधव – भोसले** /८०
२०) बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचा सच्चा सुधारक : न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे — **डॉ. चंद्रकांत रुद्राक्षे** /८४
२१) ।। नामदेवे रचिला पाया ।। — **डॉ. राजेश मिरगे** /८८
२२) संत तुकाराम यांच्या अभंगातील प्रासंगिकता — **डॉ. विठ्ठल जंबाले** /९२
२३) 'गीत गजानन'कार श्री. रा. श्री. नेरेकर : १९७० ते १९८० या दशकातील लेखक — **डॉ. अपर्णा साबणे** /९६
२४) फ्रेंच विचारवंत ऑगस्ट कॉम्टचा मानवी प्रगतीचा सिद्धांत आणि भारतीय समाज : एक चिकित्सा — **डॉ. मारोती बामणे** /१००
२५) युगप्रवर्तक ना. सी. फडके — **डॉ. सारिका बहिरट** /१०४
२६) शांताबाई दाणी यांच्या स्त्री शिक्षण व लोकशिक्षण संदर्भात केलेल्या कार्याचा अभ्यास — **डॉ. गीता शिंदे** /१०८
२७) शरणकुमार लिंबाळे यांच्या कथेतील सामाजिक संवेदना — **डॉ. हनुमंत माने** /११२
२८) स्त्री मुक्तीचे उद्गाते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर — **डॉ.कल्पना एन. गावडे** /११६
२९) ज्ञानेश्वरीतील काव्यसौंदर्याचा अभ्यास — **डॉ. मीना आहेर** /१२०
३०) महात्मा फुले यांचे विविध क्षेत्रातील योगदान — **डॉ. महालक्ष्मी मोराळे** /१२४
३१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतीयांसाठी योगदान — **डॉ. प्रभाकर घोडके** /१२८
३२) कर्मयोगी डॉ. पंजाबराव देशमुख — **डॉ. मंदा नांदुरकर** /१३२
३३) आधुनिक भारताचे शिल्पकार : स्वामी विवेकानंद — **डॉ. भारती नवथर** /१३६
३४) शाहू महाराज यांचे संगीत, नाट्य व कला क्षेत्रांतील योगदान — **डॉ. जगदीश खैरे** /१३९
३५) साहित्यिक चारुता सागर — **डॉ. प्रतिभा घाग** /१४३
३६) महात्मा जोतिबा फुले : सत्यशोधक समाज, साहित्यिक, समाजसुधारक — **डॉ. मेघना भोसले** /१४७
३७) ना. धों. महानोर यांचे शेतीविषयक लेखन — **डॉ. सोमनाथ दडस** /१५१
३८) श्री संत मन्मथ स्वामी यांच्या अभंगातील नीतिविचार — **डॉ. जितेंद्र बिराजदार** /१५५

# अरुण कोलटकरांचे मराठी साहित्याला योगदान

**डॉ. वैजयंतीमाला जाधव – भोसले**

अरुण बाळकृष्ण कोलटकर यांचा जन्म १ नोव्हेंबर १९३२ रोजी कोल्हापूर येथे झाला. त्यांचे शालेय शिक्षण १९४७ रोजी राजाराम कॉलेज येथे झाले. त्यानंतर मुंबई येथील जे.जे. स्कूल ऑफ आर्ट्स येथून त्यांनी चित्रकलेची पदवी घेतली. तर जे.जे.मध्येच ललित कलांच्या अभ्यासाची पदवी बाहेरून घेतली.

अरुण कोलटकरांनी सुरुवातीला ६०च्या दशकात जाहिरात क्षेत्रातील 'मास कम्युनिकेशन ॲन्ड मार्केटिंग (एमसीएम) या नामांकित कंपनीत अनेक वर्ष काम केले. १९८१ मध्ये त्यांनी क्रिएटिव्ह डायरेक्टर म्हणून चैत्र एजन्सीमध्येही काम केले. त्यानंतरच्या कालखंडात ते लिंटास उद्योगसमूहाच्या एका उपएजन्सीला रूजू झाले. तेथे त्यांनी अनेक कॅम्पेन तयार केल्या. कोलटकरांनी जाहिरातक्षेत्रात अनेक वर्षे काम केले. त्यांच्या कवितालेखनातही याचा प्रत्यय येतो. त्यांची दृक्कल्पना आणि कविता याचे एक अभिन्न नाते होते. अरुण कोलटकरांची कामाची हाताळणी ही अतिशय नेमकी आणि नेटकी होती. जाहिरातीचे काम असो किंवा मग रेखाचित्र, कार्टुन्स काढणे असो जोपर्यंत ते मनासारखे येत नाही तोपर्यंत ते त्यांची मांडणी पुन: पुन्हा करीत असते. किरण नगरकर आणि अरुण कोलटकर एम.सी.एम. या कंपनीत अनेक वर्षे एकत्र काम करत होते. कोलटकरांच्या काम करण्याच्या पद्धतीविषयी ते म्हणतात. ''अरुणला जर काही कामाची पद्धत असेलच तर ती 'स्पष्टता' ही आहे. ती त्याच्या जाहिरात क्षेत्राइतकीच त्याच्या कविता आणि गद्यलेखनालाही लागू होते. कावळ्याची झेप असते, तशा वृत्तीचा तो आहे. तो थेट कुठल्याही गोष्टीच्या मर्मस्थानीच जातो. त्याचे उद्दिष्ट काय आहे. हे त्याला स्पष्टच माहीत असते. आणि ते तो मिळवतो. स्पष्टतेचा अर्थ असा नव्हे की तो कधीच संदिग्ध – अस्पष्ट असणार नाही. जर तो एखादी गुंतागुंतीची निबिड कविता लिहीत असेल, जिथे प्रतिमा अधिकच गुंतलेल्या असतात तर ही संक्रमण अवस्था तुम्हाला भेटल्या भिडल्यावाचून राहणार नाही. पण त्याच्या मनात मात्र सदैव उद्दिष्टांबाबत स्पष्टता असते.''[१] कवितेच्या बाबतीतही ते जोपर्यंत ती त्यात पुन:पुन्हा बदल करत हवी तशी कागदावर येत नाही तोपर्यंत बदल करतात.

कवितेविषयीची स्पष्ट अशी थिअरी त्यांनी कधीच मांडली नाही पण ''कविता तशी गोळीबंदच हवी, तिथे शब्द नेमके न मोजकेच हवेत, एरवी शब्द ढिले झाले तर कविता काय उरली?''[२] या मतांचे ते होते. अरुण कोलटकरांनी फक्त रेषांच्या रेखाटनातून ट्रॅफिक पोलीसवर एक कार्टुन्सच पुस्तक केले. The Policemen' या नावाने प्रास प्रकाशनाने ते २००३ मध्ये प्रकाशित केले. फक्त रेषांच्या माध्यमातून ट्रॅफिक पोलीसच्या हालचालींना बांधून ठेवणारे कोलटकर आपल्या कवितांमधून शब्दांनाही तशीच हालचाल प्रदान करतात. अरुण कोलटकरांना वाचनाची प्रचंड आवड होती. वाचन, संगीत यामध्ये रस घेऊन अतिशय सूक्ष्मपणे ते या सगळ्यांचा अभ्यास करत. कागदाची निर्मिती भारतात कधी चालू झाली, कोणापासून झाली यापासून ते अगदी बटाट्याच पीक भारतात कधीपासून घेऊ लागले इथपर्यंत सगळ्या गोष्टी त्यांनी माहीत करून घेतल्या होत्या. त्यांच्या वाचनाच्या आवडीबाबत किरण नगरकर म्हणतात, ''ते बायबल असू शकते, कुराणावरचे भाष्य असू शकते, किंवा झेन ॲन्ड द आर्ट ऑफ मोटारसायकल मेन्टेनन्ससारखे पुस्तकसुद्धा असू शकते, तो काही काळ अल्-बेरूनी वाचत होता, मग एकदा अचानक तो प्लिनी ज्येष्टकडे वळला. मला माहिती नाही त्याला अचानक वनस्पती शास्त्रात कशी काय इतकी आवड निर्माण झाली की त्यासाठी त्याला हा प्राचीन रोमन लेखक वाचावासा वाटला माझा समज होता की थोरल्या प्लिनीमध्ये फक्त लॅटिनच्या अभ्यासकांना आणि विचारवंतांना रस असणार आणि अर्थातच अरुण जर का एकदा त्याबद्दल बोलायला लागला तर तो एवढे नक्की करील की ऐकणाऱ्याला ते वाचणे 'अत्यावश्यक' आहे, असे वाटायला लागेल.''[३]

मराठी, हिंदी कविता कबीराचे दोहे, तुकारामांचे अभंग हे सारे त्यांचे तोंडपाठ होते. गिटार, क्लॅरिनेटसारखी वाद्ये ते वाजवत. एकदा पखवाज हे वाद्य शिकण्यासाठी त्यांनी मुंबईतील मसजिद बंदरच्या कोणत्यातरी चाळीत राहणाऱ्या अर्जुन शेजवळ यांना शोधून काढले. आणि तिथे ते पखवाज शिकायला नियमित जाऊ लागले. शेजवळ आणि त्यांचे मित्र हे रीतसर भजन गाणारे होते. तेथे गेल्यावर कोलटकर त्यांच्यापैकीच एक होऊन जात. तिथेच त्यांची अन् बळवंतबुवांची गाठ पडली. मुंबईच्या एका वेश्यावस्तीत त्यांचे अत्तराचे दुकान आणि क्रॉफर्ड मार्केटमध्ये एक फुलांचे दुकान होते. हे बळवंतबुवा आणि त्यांच्याविषयी निगडित अनेक घटनांना त्यांनी त्यांच्या 'चिरीमिरी' या संग्रहात शब्दबद्ध केले. एकदा बळवंतबुवा दीडशे वेश्यांना घेऊन पंढरपूरला वारीला कसे गेले याविषयी त्यांनी एक कविता लिहून तो प्रसंग साक्षात डोळ्यासमोर उभा केला. बळवंतबुवा, अर्जुन शेजवळ, आणि जगन्नाथ नावाचा खाटीक आठवड्यातून किमान एकदा तरी एकत्र येऊन भजन करत असत. भजनासाठी ओबडधोबड, खणखणीत आणि खडखडीत आवाजच हवा अशी अस्पष्ट थेअरीच त्यांनी मांडली होती.

१९५४ च्या सुमारास अरुण कोलटकर, बंडू वझे, रमेश समर्थ आणि दिलीप चित्रे यांनी 'शब्द' हे संपूर्णपणे कवितेला वाहिलेले अनियतकालिक सुरू केले. यामध्ये वेगवेगळ्या कवीच्या कविता प्रकाशित होत होत्या. लघु-नियतकालिकांच्या चळवळीतील 'शब्द' हे महत्त्वाचे लघुनियतकालिक होत. जाहिरातक्षेत्रात काम करणाऱ्या कोलटकरांच हे असे कवितेशी पक्के नाते होते. ''चित्रकला मी पोटापुरती राबवतो. माझे खरे काम कवितेबरोबर आहे. असे मी समजतो. संगीताचे महत्त्व मला शब्दांच्या संदर्भातच अधिक आहे म्हणजे गाणे हा प्रकार.''[४] या मताचे ते होते. १९७४ च्या सुमारास आदिल जस्सावाला, गीव्ह पटेल आणि अरुण कोलटकर यांनी 'क्लिअरिंग हाऊस' ही प्रकाशनसंस्था काढली या मार्फत जस्सावाला यांचे Missing Person (मिसिंग पर्सन) गीव्ह पटेल यांच How Do You Withstand Body (हाऊ डू यू विदस्टॅन्ड बॉडी) अरविंद कृष्ण मेहरोत्रा यांचे Nine Enclosures (नाईन एनक्लोजर्स) आणि कोलटकरांचा Jejuri (जेजुरी) हा काव्यसंग्रह प्रकाशित करण्यात आला. कोलटकरांच्या 'जेजुरी' या काव्यसंग्रहाला १९७६ सालचा कॉमनवेल्थ पुरस्कार आणि १९७७ चा राष्ट्रकुल पुरस्कार मिळाला.

अरुण कोलटकरांनी मराठी कविताप्रमाणेच इंग्रजी काव्यलेखन केले. भारतीय इंग्रजी कवितामध्ये आदिल जुस्सावाल, गीव्ह पटेल, निस्सीम इझीकेल, कमला दास, अरविंद कृष्ण मेहरोत्रा, पार्थसारथी हे कोलटकरांचे समकालीन इंग्रजी कवी होत. अरुण कोलटकर हे द्विभाषिक काव्यलेखन करणारे कवी होत. कोलटकरांचा काव्यलेखनाचा काळ हा अतिशय गुंतागुंतीचा होता. वसाहतीकरण झालेल्या एकूण सर्वच देशांत अशी परिस्थिती होती. इंग्रजी भाषा आणि प्रादेशिक भाषा अशा दोन्ही भाषेत साहित्यिक अभिव्यक्ती होत होती.

कोलटकरांनी 'Jejuri' या संग्रहात खंडोबाच्या जेजुरी येथील देवस्थानला भेट दिल्यानंतर तेथील अनुभव, जेजुरीचा प्रवास या साऱ्यांना अतिशय तटस्थपणे शब्दबद्ध केले आहे. जेजुरीच्या आसपासचे जग तेथील विस्कळितपणा विसंगती यांना कवितेतून अधोरेखित केले आहे. कोलटकरांचे 'Sarpsatra' (सर्पसत्र) आणि 'Kala Ghoda Poems' (काला घोडा पोएम्स) हे इंग्रजीतील संग्रह अनुक्रमे २००३ आणि २००४ मध्ये प्रकाशित झाले. जनमेजय राजाने आपल्या वडिलांच्या मृत्यूचा सूड उगवण्यासाठी, सर्पकुळाचा नाश करण्यासाठी जो होम सुरू केला ते म्हणजे सर्पसत्र. हेच या संग्रहाचे कथासूत्र आहे. तर 'काला घोडा पोएम्स' मधील कविता यापेक्षा अतिशय वेगळे असे सूत्र घेऊन येतात. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील महानगर, त्यांचे बकालपण, रस्त्यावरील भिकारी, त्यांचे राहणीमान, वेश्या, भटकी कुत्री, व्यसनाधीन लोक यांचे जगणे या सगळ्यांचे चित्रण या कवितेत येते. खरे पहाता हे त्यांचे जगणे कवितेतील सौंदर्यात भर घालणारे नाही.



पण या संग्रहात ते अतिशय विनोदी आणि उपरोधिक अंगाने येते. ''The Barefoot Queen of the Crossroads''ही कविता संपूर्ण संग्रहाचे प्रतिनिधित्व करणारी कविता आहे.

'अरुण कोलटकरांच्या कविता' (१९७७) 'चिरीमिरी' (२००३), 'भिजकी वही' (२००३), 'द्रोण'(२००४) 'अरुण कोलटकरांच्या चार कविता' (२००६) असे पाच मराठी कवितासंग्रह आणि 'Jejuri' (जेजुरी, १९७६), 'Sarpsatra' (सर्पसत्र, २००३) आणि 'Kala Ghoda Poems' (काला घोडा पोएम्स, २००४) हे तीन इंग्रजी कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. त्यांना १९९३ सालचा मराठवाडा साहित्य परिषदेचा कुसुमाग्रज पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. तर १९९५ मध्ये बहिणाई प्रतिष्ठानच्या 'बहिणाबाई पुरस्काराने' सन्मानित करण्यात आले आहे. अरुण कोलटकरांवर १९७७ साली 'ऋचा' १९९३ साली 'प्रतिष्ठान' आणि २००४ साली 'अभिधानंतर' यांनी नियतकालिकांनी मराठी विशेषांक प्रकाशित केले आहेत. हिंदीमध्येही 'आवेग' या नियतकालिकाने त्यांच्यावर विशेषांक प्रकाशित केला आहे.

अरुण कोलटकरांचे मराठी व इंग्रजी काव्यलेखन १९६० नंतरच्या साहित्यप्रवाहामध्ये महत्त्वाचे ठरले आहे. भारतीय आणि प्रादेशिक भाषांमध्ये काव्यलेखन करणाऱ्या या कवीचे सप्टेंबर २००४ मध्ये पोटाच्या कर्करोगाने निधन झाले. प्रास प्रकाशनाने त्यांच्या मृत्यूनंतर २००६ मध्ये त्यांच्या चार अप्रकाशित कविता 'अरुण कोलटकरांच्या चार कविता' या नावाने प्रसिद्ध केल्या.

**संदर्भ सूची –**

१. नगरकर किरण, अरुण कोलटकर : 'भागीदारीचे शब्दचित्र' अरुण कोलटकर विशेषांक, अभिधानंतर, मुंबई, जाने-जून २००४, वर्ष ५, अंक ३-४, पृ.९.

२. नगरकर किरण, अरुण कोलटकर : भागीदारीचे शब्दचित्र अरुण कोलटकर विशेषांक, अभिधानंतर, मुंबई, जाने-जून २००४, वर्ष ५, अंक ३- ४, पृ.९.

३. शहाणे अशोक, चिरीमिरीची हकिगत, अनाघ्रात, अर्धवार्षिक, जाने-जून २००५, वर्ष १, अंक १, पृ.९.

४. नगरकर किरण, उ.नि. पृ.१०.

ꙮꙮ